महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांचे कार्यालय

**(आस्थापना शाखा - दालन क्रमांक २०२)**

कार्यालयाचा पत्ता:- नविन जिल्हा मुख्यालय, पालघर-बोईसर रोड, कोळगाव ता.जि.पालघर

दुरध्वनी क्रमांक 02525-253111 Email ID : estcollectorpalghar@gmail.com

क्र.मह/आस्था-१/टे-१/विअ/एसआर क्र. ९८/२५ दि.०७/०५/२०२५

## जाहिरात

## जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर विधी अधिकारी (कंत्राटी पध्दतीने) भरती - २०२५

१. **पदाचे नाव :-** विधी अधिकारी (कंत्राटी पध्दतीने)

२. **पदसंख्या :-** १

३. **मानधन :-** एकत्रित मानधन दरमहा रक्कम रुपये ४५०००/- आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्च रक्कम ५,०००/- असे एकुण ५०,०००/- या व्यतिरीक्त कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

४. **शैक्षणिक अर्हता व अनुभव**

४.१. **शैक्षणिक अर्हता :-** उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा (एलएलबी) व तो सनदधारक असेल.

४.२. **अन्य अर्हता :** उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४.३. **अनुभव :** विधी अधिकारी या पदांसाठी वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव असेल. (अनुभवाचे जिल्हा बार असोसिएशनचे संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे.)

४.४. **भाषेचे ज्ञान :-** उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.

५. **वयोमर्यादा :** विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

६. **कंत्राट कालावधी :** प्रथम ११ महिने.

७. अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे. खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडल्या नाहीत तर, अर्जदार अपात्र ठरेल.

७.१ पदवी प्रमाणपत्र.

७.२ कायद्याच्या पदवीबाबतचे प्रमाणपत्र (एल.एल.बी. चे प्रमाणपत्र)

७.३ सनद.

७.४ शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला.

७.५ वकिली व्यवसायाचे किमान ७ वर्षे अनुभवाचे प्रमाणपत्र. (अनुभवाचे जिल्हा बार असोसिएशनचे संमतीपत्र)

७.६ शासकीय कामाचा अनुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.

७.७ महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असल्याचे अधिवास प्रमाणपत्र

७.८ लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुना 'अ' मधील विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र.

७.९ अर्ज करणारा उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असेल तर अशा उमेदवाराच्या संबंधित कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिकारी यांचे पूर्व परवानगीचे पत्र.

७.१० विवाहीत महिला उमेदवारांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा विवाहानंतर नावामध्ये झालेल्या बदलाबाबतचे प्रतिज्ञापत्र.

७.११ मुलाखतीस पात्र ठरणाऱ्या उमेदवाराला स्वखर्चाने मुलाखतीस येताना अर्हताकारी सर्व कागदपत्रे आणणे बंधनकारक आहे.

**८. पात्रतेच्या अटी व शर्ती**

८.१. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी, उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास, त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

८.२. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांचे राहतील. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देणे, जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

८.३. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांस नियुक्ती देण्याचे झाल्यास, जिल्हाधिकारी, पालघर यांच्या कार्यालयात ११ महिन्याकरिता नियुक्ती देण्यात येईल, आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त ०३ वेळा मुदतवाढ देता येईल.

८.४. मूळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारांस नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात येईल.

८.५. महसूल व वन विभाग यांच्याकडील क्र. ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८, दिनांक ६ एप्रिल, २०११ व समक्रमांक दिनांक ३० जुलै २०११ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केलेला करारनामा नियुक्तीपूर्वी उमेदवारास करावा लागेल व तो बंधनकारक राहील.

८.६. वरील नमूद परिशिष्ठ ब या करारनाम्यातील अट क्र. १७ नुसार उमेदवारास/विधी अधिकारी यांना खासगी काम करावयाचे झाल्यास नियुक्ती प्राधिकारी यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे. परवानगीशिवाय खासगी काम करीत असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

**९. विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या**

९.१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

९.२. महसूल विषयक/परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करणे/सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

९.३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

९.४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

९.५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये, न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

९.६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यत पाठपुरावा करणे.

९.७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

**विशेष सूचना**

१. उमेदवाराने आपले अर्ज मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, पालघर, नविन जिल्हा मुख्यालय, पालघर-बोईसर रोड, कोळगाव ता.जि.पालघर ४०१४०४ या पत्यावर दि. २८/०५/२०२५ पूर्वी पोस्टाद्वारे पाठवावेत. सोबतच्या नमुन्यातील अर्ज ए-४ साईजच्या पांढऱ्या कोऱ्या कागदावर टंकलिखित/हस्तलिखित स्वाक्षरित अर्ज बंद पाकीटात सादर करता येतील.

२. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकावर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

४. जिल्हाधिकारी यांनी कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज किंवा भरती प्रकीया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवले आहेत.

५. नियुक्ती पश्चात विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणून गणला जाणार नाही.

६. भरती प्रक्रियेसंदर्भात न्यायालयीन दाव्याचे कार्यक्षेत्र पालघर जिल्हा राहिल.

७. प्रस्तावित पदावरील नियुक्तीकरीता कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास, उमेदवार नियुक्तीस अपात्र ठरेल.

८. प्राप्त अर्जाची पात्रतेच्या निकषावर अर्जाची छाननी करुन पात्र/अपात्र उमेदवारांची यादी या कार्यालयाच्या वेबसाईटवर (https://palghar.gov.in/) दि. ०२/०६/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

९. पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल. पात्र उमेदवारांनी मुलाखतीचे वेळी मूळ प्रमाणपत्रासह उपस्थित राहण्याचे आहे. तसेच मुलाखतीची वेळ व दिनांक याबाबत (https://palghar.gov.in/) या वेबसाईटवर प्रसिध्दी देण्यात येईल. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ. इंदु राणी जाखड़)
**जिल्हाधिकारी पालघर**

प्रत :- १) सुचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांस जिल्हा संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.
२) कार्यालयीन सूचना फलकावर प्रसिध्दीसाठी.

**स्थळप्रतिवर मा. जिल्हाधिकारी महोदया यांची स्वाक्षरी असे.**

(सुभाष भागडे)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**तथा सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती पालघर**

# विधी अधिकारी पदासाठी अर्ज

प्रति,
मा. जिल्हाधिकारी, पालघर
नविन जिल्हा मुख्यालय, पालघर-बोईसर रोड, कोळगाव
ता.जि.पालघर ४०१४०४

फोटोवर स्वत:ची स्वाक्षरी करावी.

महोदया,

मी विधी अधिकारी (कंत्राटी पध्दीतीने) जिल्हाधिकारी कार्यालय पालघर या पदासाठी अर्ज करीत असून माझा तपशील खालीलप्रमाणे आहे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. संपूर्ण नाव | | आडनाव | स्वत:चे नाव | वडिलांचे / पतीचे नाव |
| दोन्ही भाषेत | मराठी :- | | | |
| | इंग्रजीत :- | | | |
| २. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) | | | | |
| ३. दुरध्वनी क्रमांक | | | मोबाईल क्र. | |
| ४. ई-मेल आयडी | | | | |
| ५. लिंग | पुरुष / स्त्री | | | |
| ६. अ) जन्मदिनांक | | दिनांक | महिना | वर्ष |
| ब) वय (दिनांक २८/०५/२०२५ रोजी) | | वर्ष | महिना | दिवस |
| ७. शैक्षणीक अर्हता व अनुभव | | | | |
| अर्जदाराची शैक्षणीक अर्हता | विद्यापिठाचे नाव | | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
| अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी / पदव्युत्तर पदवी | | | | |
| ब) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कायद्याची पदवी (एल.एल.बी.) | | | | |
| क) अन्य अर्हता | | | | |
| ७.१ भाषेचे ज्ञान | मराठी, हिंदी, इंग्रजी- | | | |
| ७.२ संगणक अर्हता | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. अनुभव वकिली व्यवसायाचे किमान ७ वर्षे अनुभवाचे प्रमाणपत्र (अनुभवाचे जिल्हा बार असोसिएशनचे संमतीपत्र) | | | | |
| ९. (खाजगी / शासकीय कार्यालय) | | | | |
| १०. कार्यालय / संस्थेचे नाव व पत्ता पदनाम नोकरीचा कालावधी | | | | |
| | | | | |

जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून, या अटी व शर्तीचा भंग केल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यामध्ये माझी उमेदवारी रद्द होईल याची मी समज घेतली आहे. अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी व बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि / अनुभव माझ्यापाशी आहे. मी आणखी असे प्रमाणित करतो करतो/ करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास, खोटया माहितीच्या आधारे मिळालेली उमेदवारी किंवा निवड/ नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहिल. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**दिनांक :**

**(अर्जदाराचे नाव व सही)**

१. अर्जदाराने माहिती परिपूर्ण भरणे बंधनकारक आहे. परिपूर्ण अर्ज न भरल्यास अर्जदार अपात्र ठरले.
२. वरील अनु. क्र. ७ व ८ मध्ये नमुद केलेली प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडली नसल्यास अर्ज अपात्र ठरेल.